**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठ येथे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५४७/ २००९/ सातारा | श्री. रामचंद्र बाळकु सोनावणे मु.मिरजे, पो.पळशी, ता.खंडाळा, जि.सातारा | उपअभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, खंडाळा, | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, खंडाळा, | मौजे मिरजे, ता.खंडाळा येथील जिल्हा परिषद शाळेच्या बांधकामाबाबत | अपीलकर्त्यांने एका पेक्षा अधिक माहिती अर्जांसाठी एकच अपिल राज्य माहिती आयोगाकडे केले आहे. अपीलकर्त्यांने प्रत्येक माहिती अर्जासाठी, आवश्यक कागदपत्रांसह स्वतंत्र अपील करावे. |
| २ | ७४१/ २००९/ सातारा | श्रीमती रेखा रमेश रोकडे मु.पो. लोणंद, (माळी आळी), ता.खंडाळा, जि. सातारा | सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि., उपविभाग लोणंद, ता.खंडाळा, जि.सातारा | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि., फलटण विभाग, जि.सातारा | कृषि विकास योजने अंतर्गत शेती उद्योग पंपास विद्युत कनेक्शन देणेबाबत इतर दहा मुद्द्यांची माहिती | अपिलीय प्राधिकारी यांचा दिनांक ३.६.२००९ रोजीचा आदेश कायम करण्यात येत आहे. |
| ३ | ७९३/ २००९/ सातारा | श्री. सयाजी उर्फ बाळू गणपत वाघमारे गोदरेज गार्डन इनक्लेव्ह टॉवर, ए-१,फ्लॉट नं. २२, फिरोजशानगर, विक्रोळी(पू.), मुंबई-७९ | तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख कराड, ता. कराड, जि.सातारा | अधीक्षक, जिल्हा भूमी अभिलेख कराड, ता. कराड, जि.सातारा | खाजगी जागेच्या मोजणी संदर्भात शासकीय नियम व अटी व तद्नुषंगिक एकुण १३ मुद्द्यांची माहिती | जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, कराड यांनी त्यांच्या दिनांक १५.२.२००८ रोजीच्या पत्रान्वये अपीलकर्त्यास माहितीबाबत दिलेले उत्तर योग्य आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ७७१/ २००९/ सातारा | श्री.महंमद यूसूफ अहमद शेख मु.पो. पाटण (रामापूर), जि.सातारा ४१५२०६ | जन माहिती अधिकारी, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, ३२९, यादोगोपाळ - पेठ, राजधानी टॉवर्स, तिसरा मजला, सातारा | प्रथम अपिलीय प्राधिकारी, सातारा सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, ३२९, यादोगोपाळपेठ, राजधानी, टॉवर्स, तिसरा मजला, सातारा | रामापूर (पाटण) मसजीद ट्रस्टीची यादी, जमाखर्च पत्रक इत्यादी माहिती | १) प्रथम अपिल केलेले दिसून येत नाही. २) आयोगाकडील अपिलाच्या अनुषंगाने आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| ५ | ७७२/ २००९/ सातारा | श्री. उत्तम शिवराम कारंडे मु. पो. मल्हार, ता. पाटण, जि.सातारा | जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, जिल्हा परिषद, पुणे | प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण अधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, पुणे | भविष्य निर्वाह निधीबाबत | १) अपीलकर्त्याने मूळ माहिती अर्जात नेमकी माहिती मागणी नमूद केलेली नाही. २) आयोगाकडील अपीलाच्या अनुषंगाने आवश्यक पूरक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

वरील तक्त्यात नमूद केलेली एकूण पाच अपिले (अपील क्र. ५४७/ २००९/ सातारा, ७४१/ २००९/ सातारा, ७९३/ २००९/ सातारा, ७७१/ २००९/ सातारा, ७७२/ २००९/ सातारा) निकाली काढण्यात येत आहेत.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि३१.०७.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम , २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत:

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५५६/ २००९/ पुणे | श्री.यशवंत भगवान भिडे ओ/९, ३०३, साकेत कॉम्प्लेक्स, माजीवाडा, ठाणे (प.). | जन माहिती अधिकारी, उच्च शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, पुणे -१ | अपिलीय प्राधिकारी, उच्च शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, पुणे -१ | मुंबई विद्यापीठाच्या तक्रार निवारण समितीने १९९३ मध्ये केलेल्या शिफारशी व अर्जदारास वरिष्ठ वेतनश्रेणी १९९७ पासून लागू करणेबाबत निर्धारण समितीने केलेल्या शिफारशीवर केलेली कार्यवाही | अपीलकर्त्यांने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| २ | ५५७/ २००९/ पुणे | श्री.सुशील शंकरराव चव्हाण द्वारा डी.आर.पवार डी बिल्डिंग, फ्लॅट नं.९, शारदा हेरिटेज, सिंहगड रोड, पुणे-५१ | गाव कामगार तलाठी, मौजे गव्हाणेवाडी (हिंगणी), ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय श्रीगोंदा, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर | मौजे गव्हाणेवाडी (हिंगणी), ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर येथील गट नं.८९/२ व ८९/४ बाबत तयार केलेला फेरफार क्र.५०३ च्या मंजुरीबाबतचा अर्ज व प्रतिज्ञापत्राची प्रत | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ५५८/ २००९/ पुणे | श्री.विष्णु त्रिंबक खरे घ.नं. १५४५, अभिनव नगर क्र.१ (उत्तर), मु.पो.ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग | शाखाधिकारी स्टँडर्ड चार्टर्ड बँक, १०५ व १०७ अक्षय कॉम्प्लेक्स ढोले-पाटील रोड, पुणे -१ | शाखाधिकारी स्टँडर्ड चार्टर्ड बँक, १०५ व १०७ अक्षय कॉम्प्लेक्स ढोले-पाटील रोड, पुणे -१ | श्री.राघवेंद्र विष्णु खरे यांनी आपले बँकेकडून क्रेडिट कार्ड काढतेवेळी व तदनंतर सादर केलेल्या कागदपत्रांच्या प्रती व या क्रेडिट कार्डाच्या अनुषंगिक एकूण ८ मुद्दयांची माहिती. | माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये सार्वजनिक प्राधिकरण या संज्ञेत सदर बँकेचा समावेश होत नसल्याने माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ हा सदर बँकेला लागू होत नाही. |
| ४ | ५५९ +५६३/ २००९/ पुणे | श्री.ज्ञानेश्वर विठ्ठलराव गवस सी-४५, निर्मला को.ऑप. हौ. सो. मर्या., चिंचवड रेल्वे स्टेशन, पुणे -१९ | कार्यकारी अभियंता, जलनि:सारण क व ड प्रभाग, पिंपरी- चिंचवड महानगर-पालिका, पिंपरी, पुणे-१८ | अतिरिक्त शहर अभियंता, पाणीपुरवठा व जलनि:स्सारण विभाग, पिंपरी-चिंचवड महानगरपालिक, पिंपरी,पुणे-१८ | महानगर-पालिकेकडील समस्या निवारण दिन / लोकशाही दिनामधील टोकन क्र.८१४, २१२ व २३५ बाबत महानगरपालिका मा.आयुक्तांना दि.०१.१२.२००८ रोजी दिलेल्या अर्जावरील कार्यवाहीबाबतची माहिती. | १) अपीलकर्त्याची मूळ मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी मूळ तक्रारीबाबतची वस्तुस्थिती ८ दिवसांत अपीलकर्त्यास कळवून तसा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा. २) 'माझी समस्या निवारण झाली आहे काय ?' ही अपीलकर्त्याची विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये 'माहिती' या संज्ञेत येत नाही. |
| ५ | ५६०/ २००९/ पुणे | श्री.शेखर दत्तात्रय साळी वृंदावन हौसिंग कॉम्प्लेक्स, से.डी फ्लॅट | उप निबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (१) पुणे, स.नं.५८२/डी, | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था पुणे, साखर संकुल, | दि.१०.११.२००८ रोजी उप निबंधक यांना लिहिलेल्या पत्रासंदर्भात झालेल्या कार्यवाहीची | अपिलीय प्राधिकारी यांचा दि.२६.०५.२००९ रोजीचा निर्णय योग्य आहे. या |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | - | बी-१३, पौड रोड, कोथरुड, पुणे -३८ | गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे -३७ | शिवाजीनगर, पुणे-५ | माहिती . | निर्णयातील एकत्रित सुनावणीचा अहवाल जन माहिती अधिकारी यांनी ८ दिवसात आयोगास सादर करावा. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

१. वरील तक्त्यातील अपिले अनुक्रमांक १ ते ५ (अपील क्र. ५५६/२००९/पुणे, ५५७/२००९/पुणे, ५५८/२००९/पुणे, ५५९ + ५६३/२००९/पुणे व ५६०/२००९/पुणे ) निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपील क्र. ५५९ + ५६३/२००९/पुणे व अपील क्र.५६०/२००९/पुणे प्रकरणी निष्कर्षांत नमुद / आदेशित केल्यानुसार कार्यवाही करुन अनुपालन अहवाल आयोगास आठ दिवसात सादर करावा. अन्यथा माहितीचा अधिकार अधिनियम.२००५ च्या कलम २० अन्वये संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे शास्ती व तदनुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३० -०७-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम, १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**


राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१


राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५६८/ २००९/ सोलापूर | श्री. हुकूमचंद हरिलाल भलाणी श्री दत्तरोड, मु.पो.कुर्डुवाडी, ता. माढा, जि. सोलापूर | निवासी नायब तहसीलदार माढा, जि. सोलापूर | तहसीलदार, माढा, जि. सोलापूर | माहे जानेवारी व फेब्रुवारी २००९ मध्ये कुर्डुवाडी, माढा, मोडनिंब व टेंभुर्णी येथील किरकोळ रॉकेल परवाना धारकांना मंजुर केलेला कोटा, परवानाधारकाचे नाव, कुर्डुवाडी शहरातील सर्व रॉकेल विक्रेत्यांच्या पावत्या, शिधापत्रक यादी इ. माहिती. | १) मूळ अर्ज (जोडपत्र अ ) प्रथम अपील (जोडपत्र ब ) व जोडपत्र क दुर्वाचनीय आहे. त्यातून नेमकी कोणती माहिती अपेक्षित आहे याचा बोध होत नाही, २) माहिती तयार आहे विहित शुल्क भरुन माहिती घेऊन जाण्याचे जन माहिती अधिकारी यांनी दि.१.५.२००९ रोजी अपीलकर्त्यास कळविले आहे. अपीलकर्त्याने आवश्यक तर माहिती शुल्क भरुन प्राप्त करून घ्यावी. |
| २ | ५६९/ २००९/ सोलापूर | श्री. हुकूमचंद हरिलाल भलाणी श्री दत्तरोड, मु. पो.कुर्डुवाडी, ता. माढा, जि. सोलापूर | माहिती अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी, नगर पालिका प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर | अपिलीय प्राधिकारी, जिल्हा प्रकल्पअधिकारी, नगर पालिका प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर | कुर्डुवाडी नगरपरिषदे विरुध्द केलेल्या तक्रारीवर केलेल्या कारवाईच्या प्रती, जिल्हा प्रकल्प अधिकारी कार्यालयाकडील रोजनामा इ. माहिती | १) मूळ अर्ज (जोडपत्र अ ) प्रथम अपील (जोडपत्र ब ) व जोडपत्र क दुर्वाचनीय आहे.त्यातून नेमकी कोणती माहिती अपेक्षित आहे याचा बोध होत नाही, २) माहिती तयार आहे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | विहित शुल्क भरुन माहिती घेऊन जाण्याचे जन माहिती अधिकारी यांनी दि. १.५.२००९ रोजी अपीलकर्त्यास कळविले आहे. अपीलकर्त्याने आवश्यक तर माहिती शुल्क भरुन प्राप्त करून घ्यावी. |
| ३ | ५७०/ २००९/ सोलापूर | श्री. हुकूमचंद हरिलाल भलाणी श्री दत्तरोड, मु. पो.कुर्डुवाडी, ता. माढा, जि. सोलापूर | निवासी नायब तहसीलदार, माढा, जि. सोलापूर | तहसीलदार, माढा, जि. सोलापूर | कुर्डुवाडी शहरात शासनाने झुणका भाकर केंद्रसाठी कोणास जागा दिली, सर्व कागदोपत्री करार पत्रासह अद्ययावत माहिती | १) मूळ अर्ज (जोडपत्र अ ) प्रथम अपील (जोडपत्र ब ) व जोडपत्र क दुर्वाचनीय आहे.त्यातून नेमकी कोणती माहिती अपेक्षित आहे याचा बोध होत नाही, २) माहिती तयार आहे विहित शुल्क भरुन माहिती घेऊन जाण्याचे जन माहिती अधिकारी यांनी दि. १.५.२००९ रोजी अपीलकर्त्यास कळविले आहे. अपीलकर्त्याने आवश्यक तर माहिती शुल्क भरु प्राप्त करून घ्यावी. |
| ४ | ५७१/ २००९/ सोलापूर | श्री. अण्णा तुकाराम राऊत राऊत सदन, ३६०, (३२) अ /२ ई २/ ब, (प्लॉट नं ४) एस. टी. सोसायटी एरिया, श्रीसाईनगर-लगत, सोलापूर | १) सहायक संचालक, नगर रचना, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर २) सहा. अभियंता (बांधकाम परवाना), सोलापूर महानगरपालिका सोलापूर | विशेष कार्यकारी अधिकारी, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर २)तहसीलदार उत्तर सोलापूर तहसील कार्यालय, सोलापूर | मजरेवाडी ग्रामपंचायत बांधकाम परवाना १३२२/९० दिनांक ८.२.२००९ नकाशासह नक्कल मिळणेबाबत. | वेगवेगळया माहिती अर्जाच्या संदर्भात आयोगाकडे एकच अपील दाखल केले आहे. प्रत्येक माहिती अर्जाबाबत आयोगाकडे स्वतंत्र अपील अपीलकर्त्याने दाखल करणे आवश्यक आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | ३) निवासी नायब तहसीलदार, उत्तर सोलापूर, तहसील कार्यालय सोलापूर, | | | |
| ५ | ५९४/ २००९/ सोलापूर | श्री. रामदास तुकाराम कोकरे मु. रिटेवाडी, पो. राजुरी, ता. करमाळा, जि. सोलापूर | माहिती अधिकारी, मंडळ कृषि अधिकारी कार्यालय परंडा, जि. उस्मानाबाद | तालुका कृषि अधिकारी, परंडा पंचायत समिती समोर, परंडा, जि. उस्मानाबाद | श्री. रामदास कोकरे यांना दि. २.९.२००६ रोजी कृषि सेवक पदावरून कार्यमुक्त केल्यानंतर त्यांची सुरक्षा ठेव का देण्यात आली नाही, जाने २००६ ते जुलै २००८ या काला - वधीत ट्रेझरी मधून तालुका कृषि अधिकारी यांनी कोणकोणती बिले काढली २००६ ते २००८ शेती शाळा व लाभार्थी शेतकरी यादी व खर्च. | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

वरील तक्त्यातील अपिले अनुक्रमांक १ ते ५ (अपील क्र ५६८/२००९/सोलापूर, ५६९/२००९/ सोलापूर, ५७०/२००९/सोलापूर, ५७१/२००९/सोलापूर, व ५९४/२००९/सोलापूर,) निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. २८.०७.२००९

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठ येथे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५७२/ २००९/ सातारा | श्री. रविंद्र किसन राऊत मु.फरांदवाडी. पो.ता. फलटण, जि.सातारा | वैद्यकीय अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालय, फलटण | जिल्हा शल्यचिकित्सक, क्रांतीसिंह नाना पाटील सर्वसाधारण रुग्णालय, सातारा | १)डॉ. डोईफोडे यांचे मार्च २००८ ते मार्च २००९ या काळातील महिनावार वेतन २) टेम्परररी / रजेवर असलेल्यांचा पगार किती असतो, ३) उपजिल्हा रुग्णालय फलटणला डॉ. आनंदीबाई जोशी पारितोषिकाच्या चेकबाबत, ४) दि.१.१.०९ ते ३१.१.०९ या काळात ज्या वैद्यकिय अधिकारी यांनी सेवा केलेल्या आहेत व त्यांनी एम. एल.सी. पेशंट तपासले त्यांची नावे, तारीख व पोस्टमार्टेम केले असल्यास त्यांची नावे; ५)डॉ.व्ही.एन. डोईफोडे यांना ११ महिन्यांच्या किती नेमणुका आतापर्यंत देण्यात आल्या त्याच्या प्रति | १)अपीलकर्त्यांनी दोन वेगवेगळ्या अर्जांच्या अनुषंगाने आयोगाकडे एकच अपील केले आहे. २) अपीलकर्त्याने प्रत्येक अर्जासाठी स्वतंत्र अपील आयोगाकडे करणे आवश्यक आहे. |
| २ | ५९०/ २००९/ सातारा | श्री. दत्तात्रय कृष्णा पवार मु.पो. कोडोली, ता. व जि. सातारा | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कोडोली, ता. व जि.सातारा | ग्राम विकास अधिकारी, पंचायत समिती, सातारा | कृष्णा भिकू पवार यांच्या वारसनोंदीसाठी दि. ३०.५.०८ रोजीच्या अर्जान्वये ग्रामपंचायतीच्या झालेल्या ठरावाची व कार्यवाहीची माहिती | जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास आठ दिवसांत माहिती देऊन पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ५९१/ २००९/ सातारा | श्री.सत्वशील धैर्यशील शेळके मु.पो.लोणंद, ता.खंडाळा, जि.सातारा | निवासी नायब तहसीलदार खंडाळा, ता.खंडाळा, जि.सातारा | तहसीलदार खंडाळा, ता.खंडाळा, जि.सातारा | खंडाळा तालुक्यातील नागरीकांचे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अन्वये फेब्रुवारी २००९ अखेर प्रतिवर्षी किती अर्ज आले ? माहिती नको म्हणून किती नागरिकांनी माहिती नेली नाही, त्या अर्जांच्या प्रती | अपीलकर्त्याने मागणी केलेली माहिती ही विस्तृत स्वरुपाची असल्याने अभिलेख अपीलकर्त्यास अवलोकनार्थ उपलब्ध करुन द्यावेत व अपीलकर्त्यास हव्या असलेल्या माहितीच्या प्रती शुल्क आकारुन जन माहिती अधिकारी यांनी द्याव्यात. |
| ४ | ६९९/ २००९/ सातारा | श्री. विजय नारायण देशमुख मु.पो. कोरिवले, ता.कराड, जि.सातारा | माहिती अधिकारी, परीक्षा नियंत्रक कार्यालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | प्रभारी कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | सन २००१ पासून मागील १० वर्षांच्या प्री.लॉ. व्दितीय वर्षांच्या दिलेल्या ग्रेस मार्कसह निकालाच्या प्रती | आपण आपली गुणपत्रिकेची छायाप्रत इतर परीक्षा विभागात दाखवून स्पष्टीकरण घ्यावे, असे अपिलीय प्राधिकारी यांनी दि.२.७.२००९ च्या पत्रान्वये कळविलेनुसार अपीलकर्त्यांने माहिती प्राप्त करुन घ्यावी. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१. वरील तक्त्यात नमूद केलेली एकूण चार अपिले (अपील क्र. ५७२/२००९/सातारा, ५९०/२००९/ सातारा, ५९१/२००९/ सातारा, ६९९/२००९/ सातारा) निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपील क्र. ५१०/२००९/ सातारा व ५११/२००९/ सातारा प्रकरणी निष्कर्षात नमूद / आदेशित केल्यानुसार अपीलकर्त्यास विहित कालमर्यादेत माहिती देऊन अनुपालन अहवाल आयोगास त्वरित सादर करावा. अन्यथा संबंधित जन माहिती अधिकारी व अपीलीय प्राधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम २० अन्वये शास्तीसह तदनुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि३१.०७.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५७३ / २००९/ सांगली | श्री.हरिराम पंडित पाटील ज्ञानेश्वर नगर, कलंकी मंदिराजवळ, मु.पो.बुधगाव, ता.मिरज, जि.सांगली | कार्यकारी संचालक, वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखाना मिरज, जि.सांगली | प्रादेशिक सहसंचालक (साखर), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर | वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या साखर विक्री, उधारी, येणे बाकी अशा एकूण ३९ मुद्दयांची माहिती | अपीलकर्त्याने मूळ अर्जात मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. सदरहू माहितीविषयक अभिलेखाचे अपीलकर्त्यास निःशुल्क अवलोकन करु द्यावे. ८ दिवसांत याची पूर्तता जन माहिती अधिकारी यांनी करावी. |
| २ | ५७४/ २००९/ सांगली | श्री. दिलीपराव सखाराम माने माने ॲण्ड माने ॲटोमोबाईल, एस.टी.स्टॅण्ड समोर, इस्लामपूर, वाळवा, जि.सांगली | उप विभागीय अधिकारी, वाळवा विभाग, इस्लामपूर, जि.सांगली | अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली | सर्वश्री.ए.एस. कुंभार, आर. एस. कानडे, एस. एन. पाटील, जे.एन.कदम, पी.पी.चव्हाण व इतर हे नोकरीस कधी लागले, त्यांच्या प्रॉपर्टी प्रतिज्ञापत्राची | अपीलकर्त्यास १,२,४,५ व ६ या मुद्दयांची माहिती दिलेली आहे. मुद्दा क्र.३ बाबतची माहिती तहसील कार्यालय, वाळवा व शिराळा यांना कळविल्यानंतर त्यांच्याकडून |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | सत्य प्रत अशा एकूण ७ मुद्दयांची माहिती | माहिती घेणे आवश्यक होते, असा अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम ठेवण्यात येत आहे. |
| ५७८ / २००९/ सांगली | सचिव, नरवाड विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या., नरवाड, ता.मिरज, जि.सांगली | सचिव, नरवाड विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या., नरवाड, ता.मिरज, जि.सांगली | उपनिबंधक, सहकारी संस्था, मिरज, ता.मिरज, जि.सांगली | श्री. शंकर विठोबा शिंदे मूळअपीलकर्त्याच्या माहिती अर्जानुसार माहिती १ महिन्यात देण्याबाबत अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाच्या विरुध्द अपील | माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील नियम ६ नुसार अपील हे व्यक्तीच्या नावे करणे आवश्यक आहे ; पदनामाने नाही. |
| ५९२/ २००९/ सांगली | श्री.सुभाषचंद्र अंबादास गावडे सी.एफ. ६, सारंग रेसिडसी, शिवशंकर थिएटर शेजारी, शिवाजी रोड, मिरज | माहिती अधिकारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | वित्त व लेखाधिकारी (लेखा विभाग), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमानुसार सहाय्यक प्राध्यापक सेवा करुन नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यानंतर मिळणाऱ्या ग्रॅच्युएटीच्या अनुषंगाने माहिती | संबंधित नियमावलीची व अर्जावरील कार्यवाहीच्या सद्य:स्थितीची माहिती जन माहिती अधिकारी यांनी ८ दिवसांत अपीलकर्त्यास नि:शुल्क द्यावी. |
| ५९३/ २००९/ सांगली | श्री.सुधीर अच्युतराव देशमुख मु.देशमुख गल्ली, पो.आटपाडी, ता.आटपाडी, जि.सांगली | सहायक अधीक्षक, तालुका कृषी अधिकारी मु.पो.व ता. आटपाडी, जि. सांगली | तालुका कृषि अधिकारी, मु.पो.व ता. आटपाडी, जि. सांगली | सन २००९ मधील मौजे आटपाडी तालुक्यातील नेलकरंजी खुर्द, मौजे पिंपरी गट, मौजे दिघंची गट, मौजे निळवंडे गट | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नाहीत. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | इ. मंजूर नालाबांध गतीमान पाणलोट विकास कामाची एकूण ६ मुद्दयांची माहिती | |
| ६ | ७२२ / २००९/ सांगली | सौ.जयश्री महादेव शिंदे रा. जाखिनवाडी, ता.खानापूर, जि.सांगली | चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय सांगली ,जि.सांगली | निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय सांगली जि.सांगली | अपीलकर्त्याने दि. २०.११.२००५ रोजी जिल्हाधिकारी, सांगली यांच्याकडे केलेल्या अर्जावर करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहती | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१. वरील तक्त्यातील एकूण ६ अपिले (अपील क्र.५७३/२००९/सांगली, ५७४/२००९/सांगली, ५७८/२००९/सांगली, ५९२/२००९/सांगली, ५९३/२००९/सांगली व ७२२/२००९/सांगली) निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपील क्र. ५७३/२००९/सांगली व ५९२/२००९/सांगली प्रकरणी निष्कर्षात नमूद आदेशित केल्याप्रमाणे त्वरित कार्यवाही करुन अनुपालन अहवाल आयोगास ८ दिवसात सादर करावा; अन्यथा संबंधित जन माहिती अधिकारी व अपीलीय प्राधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये शास्ती व तदनुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३०.०७.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला,
कौंसिल हॉल समोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयुक्त, पुणे खंडपीठ, पुणे यांच्याकडे दाखल केलेली खालील अपिले निकाली काढण्यात येत आहेत :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५८/२००९/कोल्हापूर | श्री. शिरीष ऊर्फ बाळू तुकाराम वरेकर मु.पो.उदगांव (खुर्द), ता.शिरोळ, जि.कोल्हापूर | सहायक निबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालय, शिरोळ, जि.कोल्हापूर | अप्पर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे | उदगांव विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थेबाबत ११ मुद्दयांची माहिती | अपीलकर्त्याने अपिलासमवेत आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| २ | ५९/२००९/कोल्हापूर | श्री. प्रकाश दत्तात्रय मांगले 'दत्तप्रभा', ४२, विवेक सोसायटी, पुणे-९ | कार्यालय अधिक्षक (१), जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था (नागरी बँका), कोल्हापूर | अप्पर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे | अर्जदाराने पार्श्वनाथ को-ऑप. बँक लि., कडून घेतलेल्या कर्जाचे निकष व जप्त केलेल्या वस्तूंची विक्री कोणास केली याबाबतची माहिती | पार्श्वनाथ को-ऑप. बँक लि. ने अपीलकर्त्यास माहिती अर्जातील मागणीनुसार दिनांक २७.०१.२००९ रोजी उत्तर दिले आहे. उच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्र.५६६६/२००७ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार नागरी सहकारी बँकांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले क्र. १ व २ (क्र. ५८/२००९/कोल्हापूर, व ५९/२००९/कोल्हापूर) ~~१~~- निकाली काढण्यात येत आहेत.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३०-०७-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नविन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे यांच्याकडे दाखल केलेली खालील अपिले निकाली काढण्यात येत आहेत :–

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहिती | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५८४/ सातारा | श्री. समीर खु. सय्यद कच्छी चाळ, रा.ओगलेवाडी, (विरवडे), ता.कराड, जि.सातारा | गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती, कराड, जि.सातारा | गट विकास अधिकारी, वर्ग-१, पंचायत समित कराड, जि.सातारा | होली फॅमिली स्कुल विद्यानगर मध्ये प्रवेश मिळण्यासाठी दिलेल्या पत्राबाबत केलेल्या कार्यवाहीचा तपशील यासह एकूण सहा मुद्यांबाबतची माहिती | माहिती संस्था स्तरावरील असून त्यांच्याकडून घ्यावी हे जन माहिती अधिकारी यांचे उत्तर आहे. संस्थेकडून मिळालेली माहिती त्यांनी अपीलकर्त्यास दिली आहे. मात्र मुद्दा क्रमांक ६ व ७ ची नियमातील तरतुदीनुसार नेमकी माहिती दिली पाहिजे. जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती शाळेच्या मुख्याध्यापकांकडून प्राप्त करुन अपीलकर्त्यास आठ दिवसांत द्यावी व त्याबाबतचा अहवाल आयोगाकडे सादर करावा. |
| २ | ६०७/ सातारा | श्री. मोहन सुरेश प्रभुणे ५०१, मंगळवार पेठ, प्लॉट नं. २४, विद्याश्री, चिपळूणकर बाग कॉलनी, सातारा | नगर अभियंता (वृक्ष विभाग), सातारा नगर परिषद, सातारा | मुख्याधिकारी, सातारा नगर परिषद, सातारा | ५०१, मंगळवार पेठ येथील ले-आऊट, गटार, बांधकामे अतिक्रमण इत्यादीबाबतची माहिती | अपिलीय प्राधिकारी यांचे आदेशानुसार अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. माहिती देण्यास उशीर केल्याबद्दल संबंधित कर्मचा-यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यासाठी प्रस्ताव विभाग प्रमुखांनी त्वरित सादर करावा,असे अपिलीय प्राधिकारी यांनी आदेशित केले आहे. त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास त्वरीत सादर करावा. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अनुक्रमांक १ व २ ( अपील क्रमांक ५८४/सातारा व ६०७/सातारा) निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपील क्रमांक ५८४/सातारा व ६०७/सातारा बाबत आदेशीत केल्याप्रमाणे कार्यवाही करुन अनुपालन अहवाल विहित कालमर्यादेत आयोगास सादर करावा, अन्यथा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे शास्ती व तद्नुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ०२-०७-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठ येथे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५८९/ २००९/ कोल्हापूर | श्री.कृष्णा रामचंद्र कांबळे ६१०.आदर्श वसाहत, रेसकोर्सजवळ, संभाजीनगर, कोल्हापूर | व्यवस्थापक, श्री. विठ्ठल रखुमाई नागरी सहकारी पतसंस्था मर्या., मुरगुड, ता. कागल, कोल्हापूर | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर | सौ. सुभदा सुभाष नियोगी व श्री. सुभाष आनंदराव नियोगी यांचे कर्जाची परतफेड झालेली आहे काय ? असेल तर ती केव्हा केली ? | १.माहितीचा अधिकार अधिनियम.२००५ हा नागरी सहकारी बँका व पतसंस्था यांना लागू नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिटपिटिशन क्र. ५६६६/ २००७ मध्ये दिला आहे. २.अपिलीय प्राधिकारी यांनी दि. २०.४.२००९ रोजी दिलेले आदेश कायम करण्यात येत आहेत. |
| २ | ६५०/ २००९/ कोल्हापूर | श्री.ज.आ.पाटील जयशोभा संकुल, प्लॉट क्र. एस/४, हॉटेल एलिगंट समोर, टेंमलाई रेल्वे गेट जवळ, कोल्हापूर ४१६००५ | कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, सांगली | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली | श्री. जे. अे. पाटील,सेवा निवृत्त उपअभियंता यांचे देयकाबाबतची एकुण चार मुद्दयांबाबतची माहिती | अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही प्रशासकीय कार्यवाही-विषयीची आहे. त्याबाबत अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशा-नुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी यांनी आयोगाला आठ दिवसात सादर करावा. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ७०१/ २००९/ कोल्हापूर | सौ.अन्नपूर्णा अशोक जाधव व इतर २ व्दारा- श्री. अशोक यशवंतराव जाधव घर नं. ३०५२,हॉटेल निलकमल शेजारी, संकेश्वर रोड, गडहिंग्लज, जि.कोल्हापूर | जन माहिती अधिकारी, गडहिंग्लज, नगरपरिषद, गडहिंग्लज, जि.कोल्हापूर | अपीलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, गडहिंग्लज, नगर परिषद, गडहिंग्लज, जि.कोल्हापूर | बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने एकूण पाच मुद्दयांबाबतची माहिती | अपीलकर्त्याने अपीला-सोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| ४ | ७०२/ २००९/ कोल्हापूर | श्री. बाळासो तातोबा डोकरे रा.ए वॉर्ड, सि.स.नं. २३५४, तटाकडील तालीम रोड, कोल्हापूर | जन माहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, कोल्हापूर महानगर-पालिका, कोल्हापूर | अपीलीय प्राधिकारी तथा उप-आयुक्त कोल्हापूर महानगर-पालिका, कोल्हापूर | श्री. रमेश हिंदूराव देसाई अधिक्षक, कोल्हापूर महानगरपालिका, यांचे सेवा उपदान वगैरे एकुण सहा मुद्दयांबाबतची माहिती | अपीलकर्त्याने अर्जासोबत विहित मुद्रांक शुल्क (रु.२०/-) जोडलेले नाही. |
| ५ | ७०३/ २००९/ कोल्हापूर | श्री. अजित धनपाल भोरे मु.पो. पेठ वडगांव, ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर | जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक , सहकारी संस्था, हातकणंगले, जि. कोल्हापूर | अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले, कोल्हापूर | विवेकानंद नागरी सहकारी पतसंस्था (ओंकार) पेठ वडगांव संस्थेची १०१ प्रकल्पांचा रोजनामा, सेल सर्टिफिकेटस् , सेल कन्फर्मेशन पत्र, सेल प्रोसेसिंग प्रक्रिया इत्यादीबाबतची माहिती | १. माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ हा नागरी सहकारी बँका व पतसंस्था यांना लागू नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिटपिटिशन क्र. ५६६६/ २००७ मध्ये दिला आहे. २.अपीलकर्त्याने अपिलीय प्राधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले असल्याचे दिसून येत नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१. वरील तक्त्यातील एकूण पाच अपिले अनुक्रमांक १ ते ५ (अपील क्र. ५८९/ २००९/ कोल्हापूर, ६५०/ २००९/ कोल्हापूर, ७०१/ २००९/ कोल्हापूर, ७०२/ २००९/ कोल्हापूर, ७०३/ २००९/ कोल्हापूर) निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपील क्रमांक ६५०/ २००९/ कोल्हापूर मध्ये निष्कर्षात नमूद/ आदेशित केल्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास विहित मुदतपूर्तीनंतर ८ दिवसांत आयोगास सादर करावा. अन्यथा संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये शास्ती व तद्नुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२७ .०७.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम, १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५९५/ २००९/ सोलापूर | श्री. रामदास तुकाराम कोकरे मु. रिटेवाडी, पो. राजुरी, ता. करमाळा, जि. सोलापूर | जन माहिती अधिकारी मंडळ कृषि अधिकारी कार्यालय,परंडा, जि.उस्मानाबाद | तालुका कृषि अधिकारी, पंचायत समिती समोर, परंडा, जि.उस्मानाबाद | २००६ ते २००८ कालावधीत तालुका कृषि अधिकारी, परंडा यांनी तपासणी केलेली मृद संधारण कामे, मंजूर संख्या व पगार पत्रके, ठिबक सिंचन लाभार्थी, ठिबक सिंचन संच व इतर एकूण ७ मुद्यांची माहिती. | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| २ | ५९६/ २००९/ सोलापूर | डॉ. सर्जेराव चांगदेव माने ७३९, अखिल शिवाजी नगर, पाटील प्लॉट, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर | जन माहिती अधिकारी महाराष्ट्र इन्स्टीटयुट ऑफ मेडीकल सायन्स अँड रिसर्च, लातूर | अपिलीय प्राधिकारी महाराष्ट्र इन्स्टीटयुट ऑफ मेडीकल सायन्स अँड रिसर्च, लातूर | डॉ. प्रकाश गोविंदराव बुरगुटे यांचा संस्थेतील सेवेबाबतचा तपशील. | माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अन्वये सदर संस्था ही खाजगी असून सार्वजनिक प्राधिकरणांमध्ये समाविष्ट होत नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | सदर संस्थेला लागू नाही, असे अधिष्ठाता, महाराष्ट्र इन्स्टीटयूट ऑफ मेडिकल सायन्स अँड रिसर्च, लातूर यांनी नमूद केले आहे. मागितलेली माहिती त्रयस्थ पक्षाची आहे. |
| ३ | ५९७/ २००९/ सोलापूर | श्री.विजय- कुमार भगवानराव उघडे ५१, कोनापूरे चाळ, रेल्वे लाईन्स, सोलापूर | अधीक्षक, भूमी व मालमत्ता, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर | सहायक आयुक्त सोलापूर महानगर- पालिका, सोलापूर | सोलापूर शहरातील मिनी शॉपिंग सेंटर, गाळे व दुकाने किती, प्रत्येकास मासिक भाडे किती, भाडे थकबाकी इत्यादीची वार्ड निहाय व पत्ता निहाय यादी. | अपीलकर्त्याने अपिलासोबत विहित शुल्क (रू २०/-) जोडलेले नाही. |
| ४ | ५९८/ २००९/ सोलापूर | श्री. शशिकांत दशरथ देवकर दुरंदे बिल्डिंग, भूविकास बँकेजवळ, खंदक रोड, मु. पो. ता. करमाळा, जि. सोलापूर | तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, करमाळा, जि. सोलापूर | अधीक्षक, भूमी अभिलेख, सोलापूर | मौजे करमाळा येथील सि. स. नं. ७८ च्या वसलेवारीची नक्कल. | अपीलकर्त्याने नकलेसाठी सबंधित कार्यालयाच्या नियमावलीनुसार अर्ज करणे आवश्यक आहे. |
| ५ | ६४३/ २००९/ सोलापूर | श्री. प्रकाश दुर्गादासराव जोशी उपळाई रोड, देशमुख प्लॅट, शिवकॉलनी, | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद | हार्ट अटॅक बायपास सर्जरीसाठी लागणा-या खर्चास अग्रिम मिळणे बाबत दि.३.२.२००६ च्या अर्जावरील कार्यवाही, | मूळ मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत 'माहिती' ठरत नाही. मात्र |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | जनार्दन बंगला, मु. पो. ता. बार्शी, जि. सोलापूर | | | अग्रिम न देण्याचा खुलासा, अग्रिम मंजूर आदेश काढूनसुध्दा धनादेश न मिळण्याचे कारण. | सबंधित मागणीवरील कार्यवाहीची माहिती (धनादेशाबाबतची स्थिती) आठ दिवसांत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास द्यावी, व पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१) वरील तक्त्यातील अपिले अनुक्रमांक १ ते ५ (अपील क्र ५९५/२००९/सोलापूर,५९६/२००९/ सोलापूर, ५९७/२००९/सोलापूर, ५९८/२००९/सोलापूर, व ६४३ /२००९/सोलापूर,) निकाली काढण्यात येत आहेत.

२) अपील क्र ६४३/२००९/ सोलापूर मध्ये निष्कर्षात नमूद केल्यानुसार त्वरित कार्यवाही करून अनुपालन अहवाल मुदतपूर्तीनंतर आठ दिवसांत आयोगास सादर करावा, अन्यथा सबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे शास्तीसह तदनुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

पुणे
दि.३० .०७.२००९

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ